I J R S S I S, Issue (VIII), Vol. II, Jan 2023: 284-290
A Double-Blind Peer Reviewed Journal
OPEN ACCESS
e-ISSN 2347 – 517X
Original Article
Reg. No.: MH-NGP/0000167
INTERNATIONAL JOURNAL OF RESEARCHES IN SOCIAL SCIENCE AND INFORMATION STUDIES
© VMS RESEARCH FOUNDATION www.ijrssis.in

# मराठी साहित्यातील नवप्रवाह- आदिवासी साहित्य

भारती दि. रत्नपारखी-चिमुरकर
मराठी विभाग डॉ. आंबेडकर महाविद्यालय, चंद्रपूर

| Communicated : 02.01.2023 | Revision : 08.01.2023<br>Accepted : 15.01.2023 | Published: 27.01.2023 |
|---|---|---|

**सारांश :-**

आधुनिक भारताचा विचार करता आजमितीला भारताला स्वातंत्र्य मिळून ७२ वर्षे झालीत. आधुनिकीकरणाच्या काळात भारताने जागतिकीकरणाचा मार्ग स्वीकारला. या मार्गात प्रामुख्याने औद्योगिकीकरणांनी नटलेला शहरी भाग आणि भारतीय अर्थव्यवस्थेचा मूलभूत कणा म्हणून गौरविण्यात येणारा ग्रामीण भाग अशा दोन बाजूचाच भारतीय विकासाच्या दृष्टिने विचार केला जातो. पण या दोन बाजू व्यतिरिक्त अनेक विकास योजनापासून दुर्लक्षित राहणारा, दऱ्याखोऱ्यांचा आश्रय घेऊन निसर्गाच्या सहवासात आपली संस्कृतीमूल्ये जपत विकासासाठी धडपड करणारा समाजसमूह असलेल्या आदिवासी समाजाकडे फारसे कोणाचे लक्ष नाही.

भारतीय स्वातंत्र्यानंतर भारतीय राज्यघटनेला अनुसरून सर्वसामान्यांना शिक्षणाचा मुलभूत हक्क मिळावा व या शिक्षणाचे बाळकडू घेत सर्वांनी आपला विकास साधत मानवी मूल्यांची जोपासना करावी या उद्देशाने शिक्षणाचे सार्वत्रिकीकरण करण्यात आले. याचा परिणाम म्हणून साठोत्तरी कालखंडापर्यंत औद्योगिकीकरणाच्या आधारभूत शिला ठरणाऱ्या शहरी भागापासून तर ग्रामीण भागापर्यंत सार्वत्रिक शिक्षणाचे ओझरत्या स्वरूपात दर्शन व्हायला सुरुवात झाली, परंतु तेही विशिष्ट वर्गापुरतेच मर्यादित होते. प्राचीन कालखंडापासून आजतागायत गावकीच्या भावबंधनापासून दूर सारत सदोदित गावाच्या वेशीवर टांगल्या गेलेल्या बहुजन समाजाने भारतीय राज्यघटनेचे शिल्पकार डॉ. आंबेडकर यांच्या "शिका, संघटित व्हा! आणि संघर्ष करा" या क्रांतीरूपी विचारांची ज्योत तेवत ठेवत आपल्या विकासाचा मार्ग कटीबद्ध करीत जीवनानुभवाला सुरुवात केली. याच शिक्षणविषयक विचारधारेचा आधार घेत ग्रामीण भागातील तळागळातील समाज शिक्षणाची कास धरू लागले. परंतु या सार्वत्रिक शिक्षणाच्या प्रवाहात ग्रामीण व शहरी भागापासून कोसो दूर असणाऱ्या जंगलपहाड, दऱ्याखोऱ्याच्या आश्रयाला असणारा आदिवासी समुदाय मात्र साठोत्तरी दशकापर्यंत सामील होऊ शकला नाही. कदाचित या काळातील शिक्षण हे ग्रामीण भागापर्यंत पोहचले. परंतु जंगलदऱ्यांत व रानावनांत राहणाऱ्या आदिवासी समुदायाला शिक्षणाची आस लागलेली नसावी.

**बीजसंज्ञा :-** आदिवासी, साहित्य, शेती, शिक्षण.

**प्रस्तावना :**

कामाच्या किंवा व्यवसायाच्या निमित्ताने त्यांचा जंगल, दऱ्याखोऱ्यांशी संबंध येऊ लागला. त्यातूनच त्यांना प्रत्यक्षातील आदिवासी जीवन जवळून बघता आले. त्यांच्या चालीरीती, धर्मश्रद्धा, संस्कार, राहणीमान व त्यांच्यावरील अन्याय - अत्याचार प्रत्यक्षात पाहिल्यानंतर आदिवासीत्तर समाजातील लेखक सहानुभुतीच्या दृष्टिकोनातून आदिवासींचे जीवन जगासमोर आणण्यासाठी आपल्या साहित्यातून आदिवासी जीवनानुभव चितारू लागले. या साहित्यलेखनातूनच आदिवासी साहित्याच्या प्रवासाला सुरुवात झाली. परंतु शेतीच्या बांधावरून शेती बघणे म्हणजेच शेतकरी होत नसतो; तर त्यासाठी प्रत्यक्षात

शेतीत राबावे लागते. या न्यायाने आदिवासीत्तर लेखकाने लिहिलेले आदिवासी साहित्य उपरे ठरते. परंतु आदिवासी साहित्यप्रवासाला सुरुवात करणे यातच त्यांचे महात्म्य दडलेले आहेत. एकुणच साठोत्तरी कालखंडात दलित साहित्य चळवळीचा परिणाम म्हणून आदिवासी साहित्याला सुरुवात झाली. तरी प्रत्यक्षात आदिवासी समुदायातील लेखक या प्रवाहापासून दूर राहिला. साठनंतर शिक्षणाचे वारे बदलून ते ग्रामीण भागांपासून विकासरूपी प्रवाहातून जंगलाकडे वाहू लागले व आदिवासी समुदाय शिक्षणाकडे प्रवृत्त होऊ लागला. एकीकडे दलित चळवळीचा विद्रोह, ग्रामीण समुदायांची चळवळ, अनियतकालिकांची चळवळ, १९७५ च्या कालखंडातील स्त्रीवादी चळवळीचा वाढता प्रभाव तर दुसरीकडे शिक्षणाच्या प्रभावाने आदिवासी समुदायांवरील अन्याय, अत्याचार आदिवासी लेखकांना जाणवू लागला. आपल्या हक्कांसाठी १९७० च्या सुमारास आदिवासी समुदायातील लेखक लिहू लागले व खऱ्या अर्थाने आदिवासी साहित्य प्रवाहाला सुरुवात झाली.

**आदिवासी साहित्याची पार्श्वभूमी :**

आदिवासी साहित्याची पार्श्वभूमी समजून घेत असताना सुरुवातीलाच आदिवासी म्हणजे काय? व आदिवासी साहित्य नेमके कशाला म्हणायचे? हे समजून घ्यावे लागते. हे समजून घेत असताना काही आदिवासी अभ्यासकांनी यासंदर्भात आपले विचार व्यक्त केले आहेत. त्यांचा अभ्यास करणे महत्त्वाचे ठरते. आदिवासी अभ्यासकांनी व्यक्त केलेले विचार खालीलप्रमाणे सांगता येतात.

जागतिकीकरणाच्या पर्वात 'आदिवासी' हा शब्द विकासाच्या पर्वात सर्वात मागे राहिलेला या अर्थाने मागासलेली जमात म्हणून केल्या जात असला तरी आदिवासी संदर्भात एकच संज्ञा मान्य केल्या जात नाही. मराठी विश्वकोशात 'अनुसूचित जमातींना आदिवासी, मूलनिवासी, आदिम, आदिम जमाती व टोळ्याा, वन्यजाती व गिरिजन अशी वेगवेगळी नावे दिली आहेत'. इंग्रजीतील 'ॲबॉरिजिनीस' या शब्दाव्यतिरिक्त 'प्रिमिटिव्ह' म्हणजे आदिम किंवा अप्रगत लोक आणि 'सॅव्हेज' म्हणजे मागासलेले किंवा रानटी लोक होय. 'प्रिमिटिव्ह' किंवा 'सॅव्हेज' या शब्दातून आदिवासींचा मागासलेपणा, अज्ञान सूचित होते. आंतरराष्ट्रीय आदिवासी मजूर संघटनेने आदिवासींना एतद्देशीय संबोधावे असे सूचविले आहेत. तर काही विचारवंत आदिवासी हा शब्दच निराधार आहे. शब्दांच्या गोंधळातून विचाराचा गोंधळ होत असल्याने या शब्दावर बहिष्कार घालावा असेही मत मांडताना दिसतात.

आदिवासी कोण या संदर्भात आदिवासी साहित्याचे ज्येष्ठ संशोधक विनायक तुमराम म्हणतात की, "वनवासी अर्धनग्न राहून लंगोटी नेसून शिकार करण्यासाठी रानोमाळ भटकल्यामुळे वन्यजमाती असेही म्हटल्या

जाते. कधी उपहासाने जंगली किंवा लंगोटच्यो, सहानुभूतीने धरतीची लेकरे किंवा वनराईची लेकरे याशिवाय गिरिजन, भारतमातेचे आदिसंतान म्हणूनही उल्लेख होतात. अलीकडे आदिपुत्र किंवा वनपुत्र, जंगलचे अनभिषिक्त राजे, भारतीय राज्यघटनेने त्यांना अनुसूचित जमाती म्हटले आहे."१

एकुणच वरील अर्थच्छटा आदिवासी संदर्भात वेगवेगळ्याा दृष्टिकोनातून वापरल्या असल्याचे दिसून येते. हा समाज विशिष्ट भाषा, विशिष्ट जीवन पद्धती, आपली धार्मिक व सांस्कृतिक मूल्ये शेकडो वर्षापासून जोपासत आहेत. जंगलपहाडांचा आश्रय घेऊन जगत असलेल्या मानवी समूहांची ओळख करून देण्यासाठी हा शब्द वापरल्या जातो. त्याचबरोबर त्यांच्या सामाजिक व्यथेवर त्यांच्या उद्ध्वस्त जीवनाबद्दल हळहळ व्यक्त करण्यासाठी वापरल्या जातो. अर्धनग्न अवस्थेत राहून लंगोटीचा पेहराव धारण करून जगण्याच्या धावपळीत पोटाची खळगी भरण्याकरिता शिकारीसाठी रानोवन, वणवण भटकल्याने त्यांना वनवासी किंवा वन्य जमाती म्हणून ओळखण्याचा प्रघात पडला. तर अनेक वर्षे गिरिकंदहारात वास्तव्य करणारे म्हणून गिरिजन हा शब्दही योग्य मानतात. तर आदिपुत्र, वनपुत्र, जंगलाचे अनभिषिक्त राजे म्हणूनही त्यांचा अनेक ठिकाणी उल्लेख केला जातो.

**व्याख्या :**

**गिलीन आणि गिलीन :** "एका विशिष्ट भू-प्रदेशावर राहणारा समान बोली बोलणारा व समान सांस्कृतिक जीवन जगणारा पण अक्षर ओळख नसलेल्या स्थानीय गटांच्या **समुच्चयाला आदिवासी म्हणतात."२**

**मदन व मुजुमदार :** "समान भाषा व समान संस्कृती असणाऱ्या व आर्थिक दृष्टिने परस्परसंबंधित असणाऱ्या ग्रामीण समुदायाच्या समुच्चयाला नेहमी आदिवासी समाज म्हणून संबोधले जाते."३

**आदिवासी साहित्याची संकल्पना व स्वरूप :**

आदिवासी साहित्याच्या संकल्पनेचा विचार करीत असताना प्रामुख्याने आदिम जमातीत जन्म घेऊन त्या जमातीच्या रूढी, परंपरा, धर्म, विवाह, सण, उत्सव त्यांच्या जीवनाला ग्रासलेली गरीबी, अन्याय, अत्याचार, आरोग्य, अंधश्रद्धा, शैक्षणिक, समाजिक, आर्थिक व्यवस्था याविषयी अतिशय गांभीर्यपूर्वक चिंतन केले पाहिजे. आपल्या समाजाला आत्मभान प्राप्त करून देण्याच्या उद्देशाने व त्यांच्यावर झालेल्या अन्याय-अत्याचाराचा सामना करण्यासाठी संवेदनशील भावनेतून साहित्यनिर्मिती करणारे आदिवासी साहित्यिक आहेत. त्यांच्या समस्येला वाचा फोडण्याचे काम अनेक आदिवासीत्तर साहित्यिक करताना दिसतात. म्हणूनच आदिवासी साहित्याच्या संकल्पनेचा अभ्यास करताना अभ्यासकांच्या मतांचा

विचार करणे महत्त्वाचे ठरते ते खालीलप्रमाणे

**(१) डॉ. शरच्चंद्र गोखले :** "दलित व आदिवासींच्या भोवतालची सांस्कृतिक चौकट व वातावरण वेगळे आहे. आदिवासींना समृद्ध संस्कृतीची चौकट आहे. आदिवासींच्या संस्कृतीला मातीचा सुगंध आहे. त्यामुळे आदिवासी साहित्य ही दलित साहित्याची नक्कल न होता त्याला स्वत:चं असं वळण व शैली असली पाहीजे."४ डॉ. गोखलेच्या या व्याख्येतून आदिवासी साहित्य कुणाची नक्कल नसून ते खास भारतीय जाणिवेचे साहित्य आहे याची जाणीव होते.

वरील व्याख्यांचे निरीक्षण करता असे लक्षात येते की, प्राचीन कालखंडापासून संस्कृतीचे गोडवे गाणाऱ्या प्रस्थापित समाजव्यवस्थेतील जीवनाविष्कार व पांढरपेशीय जीवनानुभवाच्या कक्षेबाहेर जाऊन कोसो दूर जंगलात निसर्गाच्या छत्रछायेखाली स्वत:ची स्वतंत्र अशी जीवनशैली जगणाऱ्या आदिवासी समाजाचे जीवनविश्व ज्या साहित्यात चितारले जाते. त्या साहित्याला आदिवासी साहित्य म्हणता येईल. हे साहित्य कुणाची नक्कल नसून त्याला आपल्या मातीचा, स्वतंत्र जीवनशैलीचा गंध लाभला आणि आधुनिक युगाला लाजवेल असा जीवनाविष्कार आदिवासी साहित्यातून प्रकट झाला. एकूणच ज्या साहित्यातून आदिवासी समाजजीवनाचे जीवनदर्शन घडते त्या साहित्याला आदिवासी साहित्य म्हणता येईल.

प्राचीन काळापासून आर्य-अनार्यांच्या स्वामित्व मिळविण्याच्या संघर्षात आपल्या बाहूबलाचा वापर करीत स्वतंत्र जीवनशैली जगणाऱ्या अनार्यरूपी आदिमांचा कुटीलतेने पराभव करीत आर्यांनी स्वामित्व निर्माण केले. त्याचवेळी आदिम समाजाने क्रूर संहाराकडे दुर्लक्ष करीत दऱ्याखोऱ्यात, जंगलपहाडात, निसर्गाच्या सान्निध्यात स्वत:च्या जीवनशैलीचा अंगीकार करीत स्वत:चे विश्व निर्माण केले. पुढे अनेक आदिमांनी इंग्रज सरकारला आपल्या बुद्धिचातुर्याच्या बळावर सळो की पळो करीत क्रांतीच्या ज्वाला पेटविल्या. परंतु आजच्या प्रस्थापित इतिहासाने त्याची फारशी दखल घेतली नाही. त्या शौर्यविरांच्या पराक्रमाची कहाणी आदिवासी साहित्य सांगते. केवळ सांगतच नाही; तर सर्व आदिम बांधवांना अन्यायाविरुद्ध क्रांतीची मशाल पेटविण्याची प्रेरणा देते.

स्वातंत्र्योत्तर कालखंडात हळूवारपणे शिक्षणाचे वारे हे गावाच्या वेशीकडून जंगलाकडे जायला लागले. अनेक आदिवासीत्तर समाजातील व्यक्ती व्यवसायाच्या निमित्ताने जंगलाकडे यायला लागले. तेथूनच त्यांची नजर आदिमांकडे जाऊन आदिमांचे जीवनविश्व मराठी साहित्यात उतरू लागले. पुढे आदिवासी समाजातील अनेकांनी शिक्षणाची कास धरली. त्यांना आपल्या समाजाच्या वर्षानुवर्षाच्या व्यथा, वेदना जाणवू लागल्या.

नवपरिवर्तन घडवून आणण्याच्या उद्देशाने आणि अन्याय केला त्यांच्या विरोधात विद्रोह पुकारून समाजबांधवांना आत्मभान प्राप्त करून देण्यासाठी लेखणी उचलल्या. या लेखणीच्या माध्यमातून आदिवासी जीवनविश्व, त्यांच्या व्यथा, वेदना ज्या साहित्यातून साकारल्या जाऊ लागल्या ते साहित्य म्हणजे आदिवासी साहित्य होय.

मराठी साहित्याला प्राचीनत्त्वाचे लेणे जरी लाभले असले; तरी या पृथ्वीतलावरील मूलनिवासी असलेल्या धरतीच्या पुत्राला स्वातंत्र्यपूर्व कालखंडापर्यंत फारसा न्याय मिळालेला दिसत नाही. गोविंद गारे म्हणतात की, "आदिवासी म्हणजे निबिड अरण्यात अर्धनग्न अवस्थेत राहणारे, नरभक्षक, कच्चे मांस खाणारे, शिकार करून जगणारे असेच त्यावेळी लोकांना वाटत होते. आदिवासी हे नावही त्यावेळी रूढझालेले नव्हते. आदिवासी हे निशाद, किरात, वाल्या, कोळी आणि शबरी यांचे वंशज आहेत व त्यामुळे ते दुराचारी दृष्ट आणि क्रूर आहेत अशी लोकांची कल्पना होती."५ रामायण, महाभारताच्या काळापासून जुन्या वाङ्मयात त्यांचे वर्णन कावळ्यापेक्षा काळे, धरतीचे पापी प्राणी, खुजे चपट्याा नाकाचे, लुटारू, राक्षस, नरभक्षक वगैरे उपहासात्मक व हीन लेखणाऱ्या शब्दांनी केलेले आढळते. साहजिकच लोकांमध्ये त्यांच्या संबंधी गैरसमज निर्माण झाले आहेत. एकुणच प्राचीन कालखंडातील रामायण, महाभारत यासारख्या सर्वमान्य साहित्यात आदिवासींना यक्ष, किन्नर, निशाद, किरात यासारख्या उपाद्या देऊन अपमानास्पद वागणूक देण्यात आली. इंग्रजांच्या दिडशे वर्षाच्या राजवटीत अनेक आदिम पुत्रांनी प्रस्थापित समाजव्यवस्थेतील चळवळीच्या पूर्वीच इंग्रज सरकारला सळो की पळो करून सोडले. त्या आदिवासींची प्रस्थापितांनी लिहिलेल्या इतिहासात फारसी दखल घेतली गेली नाही. आदिम जमातीच्या इतिहासाची गळचेपी करण्यात येऊन प्रस्थापित समाजव्यवस्थेने गुन्हेगारीचा ठपका मारत जंगलात फेकले ते कायमचेच.

स्वातंत्र्योत्तर कालखंडात रंजनवादाच्या पडझडीत गुरफटलेले मराठी साहित्य खऱ्या अर्थाने समाजवास्तवाच्या पापुद्र्यांना स्पर्श करीत सामाजिक अन्याय- अत्याचाराचा पाढा वाचत त्याविरोधात बंडाचा झेंडा घेऊन जागतिक साहित्याला धडक मारू लागले. त्यात प्रामुख्याने दलित साहित्य, ग्रामीण साहित्य, जनवादी साहित्य या साहित्य प्रावाहांचा समावेश आहे. या साहित्यिक चळवळीने भारतीय समाजव्यवस्थेच्या अनेक अंगांना स्पर्श करीत तळागाळातील समाजव्यवस्थेचा वेध घेतला. त्यांच्या समाजमनात शब्दरूपी हुंकार भरण्याचे काम या साहित्यिक चळवळीने केले. या चळवळीमुळे प्रस्थापित समाजव्यवस्था हादरून जाऊन अभिजनवादी साहित्यबाजूलासारलेगेले. या कालखंडात

इतिहासाचा बोध घेत प्रस्थापित समाजव्यवस्थेचा विरोध स्वीकारून साहित्यविषयक चळवळ तळागाळातील समाजव्यवस्थेला आत्मभान प्राप्त करून देण्यात आदिवासी साहित्ययशस्वी ठरली.

शहरातील व ग्रामीण भागातील वनसंपत्ती, खनिजसंपत्तीचा पुरेपूर वापर केल्यानंतर उच्चभ्रू वर्गाची नजर जंगल खोऱ्याकडे पडायला सुरुवात झाली. कुणी व्यवसायाच्या निमित्ताने, कुणी जंगल, पहाडांचा मनसोक्त आंनद घेण्याच्या हेतूने जंगलाचा आश्रय घेऊ लागली. याच माध्यमातून शिक्षणाचे वारे जंगलाकडे फिरकायला लागले. या जंगल सफारीतून काही संवेदनशील माणसे जंगलातील आदिम जीवनाचे प्रत्यक्ष जगणे बघून भारावून गेलेत. सहानुभूतीच्या रूपाने आदिम जीवनचित्रण आपल्या साहित्यात उतरविण्यास सुरुवात केली. येथूनच खऱ्या अर्थाने आदिवासी साहित्याची मुहूर्तमेढ रोवल्या गेली.

कालांतराने आदिम समाजसुद्धा बाजारहाटाच्या, व्यापाराच्या निमित्ताने नागरी समुदायाच्या संपर्कात येऊ लागला. या संपर्कातूनच नागरी समुदायाचे अनुकरण करत त्यांनी सुद्धा शिक्षणाची कास धरली. पुढे दलित साहित्याला आदर्श मानत आपल्या समाजाच्या मर्यादावत्यांच्यावरील वर्षानुवर्षे झालेला अन्याय-अत्याचार जाणून घेतला. या विदीर्ण वास्तवानुभवातूनच आपल्या समाजाला शोषणरुपी गुलामीच्या जोखडातून बाहेर काढण्यासाठी, त्यांना स्वत:च्या अस्तित्त्वाची जाणीव करून देत आत्मभान प्राप्त करण्यासाठी त्यांच्या व्यथा, वेदना, अन्याय-अत्याचाराचा पाढा वाचत त्याविरोधात संघर्ष करण्यासाठी त्यांच्या लेखणी सरसावू लागल्या. यातूनच साहित्याच्या वेगवेगळ्याा प्रकारात आदिवासी साहित्यिक हिरिरीने लिहू लागले. विनायक तुमराम, वाहरु सोनवणे, भुजंग मेश्राम यासारख्या आदिवासी समाजातील साहित्यिकांचा उदय होऊन १९८० च्या सुमारास आदिवासी साहित्यप्रवासाला सुरुवात झाली.

आदिवासी साहित्य हे कोणत्याही साहित्याची नक्कल नाही. तर स्वत:च्या अस्मितेवर वर्षानुवर्षे झालेला अन्याय-अत्याचार सहन करत, प्रस्थापित समाजव्यवस्थेपासून दूर राहून निसर्गाच्या छत्रछायेखाली स्वच्छंद जीवन जगताना दिसतात. आपल्या सांस्कृतिक परंपरा जोपासत ज्या परंपरा आजच्या प्रस्थापित व्यवस्थेलाही लाजवतील, त्याचबरोबर स्वातंत्र्य, समता, बंधुता या तत्त्वांचा पुरस्कार करीत म. फुले, डॉ. आंबेडकरांच्या विचारांना प्रेरणा मानून आपल्या समाजबांधवांना आत्मभान प्राप्त करून देण्यास पुढे येताना दिसते.

आदिवासी जमाती या प्रामुख्याने निसर्गाच्या सान्निध्यात असल्याने त्याचे कादंबरीतले जीवनसुद्धा जंगल, पहाडखोऱ्यातील

निसर्गाच्या विविध छटा, नदी, नाले, जंगल, वन्य पशू यांचे चित्रण मोठ्याा प्रमाणात आदिवासी कादंबरीत पाहायला मिळतात. अशिक्षित, गुन्हेगार, रानटी शिवाय त्यांची वस्त्रहीन वेशभूषा त्यांचा धार्मिक भोळेपणा, व्यसनाधीनता, लाचारीपणा शोषणव्यवस्थेचे जणू काही केंद्रबिंदू हा आदिवासीच आहे, अशी वास्तवानुभुती आदिवासी कादंबरीत पानापानात विखुरल्याचे दिसून येते. आदिवासी कादंबरीत प्रकर्षाने जाणवतो तो त्यांचा लोकसाहित्य विचार, त्यांच्या रूढी, परंपरा, स्त्री स्वातंत्र्याची संकल्पना, स्वातंत्र्य, समता, बंधुता हे मानवधर्म व या तत्वांना शोभेसी अशी बोलीभाषा हा आदिवासी कादंबरीचा ठेवा आहे.

**निष्कर्ष :**

१. आदिवासी साहित्याचा आशय हा प्रामुख्याने परिवर्तनाभिमुख समाजसन्मुख असल्याने त्यात क्रांतीची ज्योत तेवत नवसमाजनिर्मितीला चालना देत आहे.

२. आदिमांना पाषाण काळापासून प्रस्थापितांनी जंगलपहाडात राहायला भाग पाडून अनेक सोयी-सुविधांपासून वंचित करून त्यांच्या मानवतेचा हक्क हिरावून घेतला. अशा व्यवस्थेविरुद्ध विद्रोह पुकारण्याची भूमिका आदिवासी साहित्याची आहे. आदिवासी जमातीअंतर्गत वाढत जाणाऱ्या रूढी, परंपरा, अज्ञान, व्यसनाधीनता यावर कडाडून हल्ला चढवत आदिवासींना विज्ञानाची कास धरायला लाऊन विकासास बाध्य करणे हा आदिवासी साहित्याचा गाभा आहे.

३. आदिवासींना सावकार, भांडवलदार व सरकारच्या कुचकामी धोरणांपासून जो अन्याय, अत्याचार होत आहेत त्यातून मुक्तता हवी. भारतीय प्रस्थापित समाजव्यवस्थेने ज्यांच्यावर अन्याय, अत्याचार केला त्या आदिमांचे हे साहित्य आहेत.

४. शेकडो वर्षे सहन केलेल्या अन्यायाचे हे साहित्य प्रतीक असून नवसमाजनिर्मितीच्या प्रबोधनाचे प्रभावी हत्यार आहेत. स्वातंत्र्य, समता, बंधुता या तत्त्वांचा पुरस्कार करीत हे साहित्य मराठी साहित्यात भरारी घेत आहे. त्याच्याशी निगडीत असणाऱ्या नव्या प्रतिमा, भाषाशैली, आशयघनता, अलंकार, रोजच्या बोलण्यातील म्हणी, वाकप्रचार यांचा आविष्कार करणारे साहित्य आहेत. त्याचबरोबर आदिमांचे नैसर्गिक भावविश्व व्यक्त करणारे साहित्य आहे.

**संदर्भ :-**

वाल्हेकर ज्ञानेश्वर, 'आदिवासी मराठी साहित्य एक अभ्यास', स्वरूप प्रकाशन, औरंगाबाद, द्वि.आ., २०१२, पृ. १०

तुमराम विनायक, 'आदिवासी साहित्य स्वरूप आणि समीक्षा', विजय प्रकाशन, नागपूर, प्र.आ., १९९४, पृ. ७

उनी. पृ. ५

तत्रैव, पृ. १२

वाल्हेकर ज्ञानेश्वर, उनि, पृ. ३५